**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **तरुणाईचा स्वच्छतेसाठी उस्फुर्त सहभाग**
- **सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम ८.०' यशस्वीरित्या पूर्ण - सहभागी विद्यार्थ्यींना प्रमाणपत्रांचे वितरण**

शहराच्या स्वच्छतेसाठी तरुणाईने खांद्याला खांदा लावून काम केल्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम ८.०'. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने राबवण्यात आलेला हा उपक्रम १९ ऑगस्ट २०२४ ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत यशस्वीरित्या पार पडला.या इंटर्नशिपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वच्छता मोहिमा, जनजागृती रॅली, क्षेत्रीय निरीक्षण, माहिती संकलन, दस्तऐवजीकरण, तसेच महापालिकेच्या विविध विभागांशी प्रत्यक्ष समन्वय साधण्याचा अनुभव मिळाला. या उपक्रमाने केवळ प्रशिक्षणच दिले नाही, तर शहराच्या स्वच्छतेसाठी योगदान देण्याची संधीही निर्माण केली आहे.

'सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम ८.०'. पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र वितरण समारंभ मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालय येथे १९ जून २०२५ रोजी माननीय आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार व शहर अभियंता दिपक खांबीत यांच्या उपस्थितीत सर्व सहभागी तरुणांना त्यांच्या समर्पण, मेहनत आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.महानगरपालिका प्रशासनाने या युवा सहभागाचे विशेष कौतुक करताना सांगितले की, "सफाईमित्र इंटर्नशिप हा केवळ एक उपक्रम नाही, तर तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकी व नागरी जबाबदारी जागवणारी एक चळवळ आहे."

शहर स्वच्छतेच्या दिशेने वाटचाल करताना तरुणाईचा आवाज आणि कृती दोन्ही महत्त्वाची आहेत हे या उपक्रमातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. भविष्यातही अशा उपक्रमामध्ये अधिकाधिक तरुणांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील विद्यार्थ्यांना केले आहे.या प्रमाणपत्र वितरण समारंभात कार्यकारी अभियंता श्री. शरद नानेगावकर (पाणी पुरवठा विभाग) तसेच इतर मनपा अधिकारी,कर्मचारी व प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.